RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक १०(५)] सोमवार, जानेवारी १६, २०१७/पौष २६, शके १९३८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक २२

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.**—महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्याचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम आणि महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांची वेतने व भत्ते अधिनियम, १९७८ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. | पृष्ठे १-३ |

दिनांक १३ जानेवारी २०१७ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रकाश हिं. माळी,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग.

---

### सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक १६ जानेवारी २०१७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम आणि महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांची वेतने व भत्ते अधिनियम, १९७८ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९५६ चा ४७. १९५६ चा ४८. १९५६ चा ४९. १९७८ चा महा. ८.

**ज्याअर्थी**, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम आणि महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांची वेतने व भत्ते अधिनियम, १९७८ यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या सदुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे:-

प्रकरण एक

## प्रारंभिक.

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास,महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते आणि महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांची वेतने व भत्ते (सुधारणा) अधिनियम, २०१६,असे म्हणावे.

(२) तो दिनांक २४ ऑगस्ट २०१६ पासून लागू असल्याचे मानण्यात येईल.

प्रकरण दोन

## महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम याची सुधारणा.

सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम ३ ची सुधारणा. २. महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश "सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ मध्ये "मूळ वेतन व महागाई भत्ता आणि इतर भत्ते" या मजकुराऐवजी "मूळ वेतन व महागाई भत्ता " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९५६ चा ४७.

सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम १० ची सुधारणा. ३. सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम १० मध्ये "मूळ वेतन व महागाई भत्ता आणि इतर भत्ते" या मजकुराऐवजी "मूळ वेतन व महागाई भत्ता" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४७ याचे कलम १०अ वगळणे. ४. सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते अधिनियम याचे कलम १०अ वगळण्यात येईल.

सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम ११अ ची सुधारणा. ५. सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते अधिनियम याचे कलम ११अ मधील, पोट-कलम (२) वगळण्यात येईल.

प्रकरण तीन

## महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम याची सुधारणा

सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम ३ ची सुधारणा. ६. महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश "मंत्र्यांचे वेतन व भत्ते अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ मध्ये,– १९५६ चा ४८.

(१) पोट-कलम (१) मधील, " मूळ वेतन व महागाई भत्ता आणि इतर भत्ते" या मजकुराऐवजी "मूळ वेतन व महागाई भत्ता" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) पोट-कलम (२) मधील, "मूळ वेतन व महागाई भत्ता आणि इतर भत्ते" या मजकुराऐवजी "मूळ वेतन व महागाई भत्ता" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

७. मंत्र्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याचे कलम ५ मधील, पोट-कलम (२) वगळण्यात येईल. सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम ५ ची सुधारणा.

प्रकरण चार

## महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम याची सुधारणा

१९५६ चा ४९. ८. महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम याच्या कलम ३ मध्ये, पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईलः- सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४९ याच्या कलम ३ ची सुधारणा.

" (१) या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, प्रत्येक सदस्यास, आपल्या पदावधीत, महाराष्ट्र शासनाच्या प्रधान सचिवाला अनुज्ञेय असणारे आणि वेळोवेळी सुधारणा करण्यात येईल असे, किमान मूळ वेतन व महागाई भत्ता मिळून होणाऱ्या वेतनाएवढे वेतन देण्यात येईल. ".

प्रकरण पाच

## महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांची वेतने व भत्ते अधिनियम, १९७८ याची सुधारणा

१९७८ चा महा. ८ ९. महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांची वेतने व भत्ते अधिनियम, १९७८ (यात, यापुढे, या प्रकरणांत, ज्याचा निर्देश "महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांची वेतने व भत्ते अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ मध्ये "मूळ वेतन व महागाई भत्ता आणि इतर भत्ते" या मजकुराऐवजी "मूळ वेतन व महागाई भत्ता" हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ३ ची सुधारणा.

१०. महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांची वेतने व भत्ते अधिनियम याचे कलम ५ मधील, पोट-कलम (२) वगळण्यात येईल. सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ५ ची सुधारणा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A,NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.